रावांचे नाव घेते...

# अुखाणे

डॉ. सौ. प्रतिभा प्रभाकर शिराळकर

रजत प्रकाशन, औरंगाबाद

अुखाणे
**डॉ. सौ. प्रतिभा प्रभाकर शिराळकर**
'श्रीप्रभा', ११५, टिळकनगर, औरंगाबाद.
फोन : (०२४०) २३२९९७८

◆ **प्रकाशन क्र. ३८७**

© लेखिकेकडे

◆ **प्रकाशक**
**रजत प्रकाशन**
१४, जय विश्वभारती कॉलनी,
चेतक घोडा चौक, औरंगाबाद
भ्रमणध्वनी : ९८५०१४००२५

◆ **पुणे शाखा**
द्वारा वैभवी इंटरप्राईजेस
६६६, नारायण पेठ, नू. म. वि. समोर,
पुणे-३०.

◆ **अक्षरजुळणी**
अक्षर कॉम्प्युटर, औरंगाबाद

◆ **मुद्रक**
ओंकार प्रिंटर्स,
सिडको, औरंगाबाद

◆ **मुखपृष्ठ**
अनिल जोशी, औरंगाबाद

◆ **प्रथमावृत्ती** : २६ जानेवारी २०१३

◆ **मूल्य** : ३० रूपये

# अुखाणे

गणेशाला वंदन करून
लेखणी धरते हातात
१९५८ साली गोपाळ मुहुर्तावर
प्रभाकरांच्या सह आले शिराळकरांच्या घरात

❐

सुख-समृद्धीची नाही येथे वाण
प्रतिभा-प्रभाकरचे घर म्हणजे बुद्धी,
प्रतिभा आणि प्रीतीची आहे खाण



## मनोगत

अुखाणे घेण्याची रीत जरी पुरातन असली, आणि नवीन पिढीला ती मान्य नसली तरी, त्यातील गोडवा माधुर्य व तो घेताना गालावर चढलेली लाली बघतांना फारच छान वाटते. षोडषीपासून तर वृद्धांपर्यंत स्त्रिया अुखाणे घेताना किती आढेवेढे घेतात आणि प्रत्यक्ष घेताना त्या वयातसुद्धा किती सहजपणे लाजतात, हे प्रत्यक्ष अनुभवायला मिळते आणि मुख्य गोष्ट म्हणजे पतीचे नाव घ्यावयाचे असते, पण थोडा वेळ आढेवेढे घेऊन, भाव खाऊन अुखाणे घेण्याची आजकालची पद्धतच होऊन बसली आहे. पण तेच एखादी मुरब्बी वयस्कर स्त्री चटकन बुद्धीचे कौशल्य पणाला लावून अुखाणा घेऊन वातावरणात हास्याचे कारंजे उडविते. तेव्हा असा आहे हा अुखाण्याचा प्रताप. आपण नेहमी म्हणतो 'नावात काय आहे' पण अहो त्या नावातच सगळं आहे. नाव घेतानासुद्धा कितीजणी अतिशय मार्मिक असा अुखाणा घेतात. तो कधीतरी मनाच्या कप्प्यांत खोलवर दडून बसतो व घेणाऱ्याच्या बुद्धीची प्रशंसा करावीशी वाटते. म्हणून वाटते 'क्षण येवो क्षण जावो, अुखाण्यांची अविट गोडी कायम राहो.'

**- डॉ. सौ. प्रतिभा शिराळकर**

## प्रस्तावना

अुखाण्यांचा हा संग्रह अवनी महिला ज्येष्ठ नागरिक संस्था आपल्याला संक्रांत भेट म्हणून देत आहे. ते खरंच प्रशंसनीय आहे. आजच्या युगात सुशिक्षित व प्रौढ कुमारिकांना लग्न झाल्यावर नवऱ्याचे नाव अुखाण्यात गुंफायला आवडत नाही. चारचौघांत जास्तच जबरदस्ती झाली तर त्या नाव नुसतेच घेतात, पण अुखाण्यात नाही. हा पिढीतील फरक व संस्कारक्षम नसलेले मन याचा दाखला आहे. पण काही जरी झाले तरीही बुद्धीकौशल्य-पणाला लावून घेतलेल्या शब्दांची गुंफण अतिशय खोलवर रुजणारी आहे. पतीच्या नावाला काव्याची गुंफण घालून समाजात चारचौघासमक्ष त्याचे सादरीकरण करण्याची ही प्राचीन पद्धत आज आपल्याला नाहिशी होत चाललेली दिसते. अशा या पद्धतीचे 'मोहंजोदारो' नको व्हायला. लग्न झाल्यावर प्रथमतः पतीचे नाव घेणारी षोडशी बघितली की, आपले मन पण भूतकाळात रमते. नाव घेण्यात मुलीच्या बुद्धीकौशल्याचे प्रदर्शन, पतीबद्दलची प्रीती, सासरची ओढ व माहेरच्या नात्याचे विस्मरण ह्या अनेक भावनांचा त्रिवेणी संगम म्हणजे अुखाणा. त्याची गोडी काही अवीटच. मैत्रेयी ज्ञानदीप मंडळ व अवनी महिला ज्येष्ठ नागरिक संस्थेचा हा जो प्रयत्न आहे, तो वाखाणण्यासारखा आहे. त्यांच्या हातून दरवर्षी अशाच प्रकारच्या वाङ्मयाची निर्मिती व्हावी, ही आशा.

**- डॉ. सौ. शोभा नैन**
**- श्री. दिनेश नैन**

## उखाणे

- यामिनीच्या अंगावर चांदण्याचा शेला
  -------- रावांनी माझ्या हाती सौभाग्यकलश दिला.
- मुलगा माझा कंठमणी, मुलगी माझी तन्मणी
  -------- रावांच्या हृदयाची मी आहे स्वामिनी.
- टाळ वाजे वीणा वाजे वाजे पखवाज गं,
  मैत्रेयीच्या सहवासांत गाजला याज्ञवल्क्य गं.
- सर्व कार्याचा पाठीराखा विघ्नहर्ता गणेश
  -------- राव आहेत आजपासून माझ्या जीवनाचे परमेश.
- पूजिला गौरीहार दिला आशीर्वाद
  ------- च्या प्रवेशते संसारात निर्विवाद.
- सप्तपदीच्या सात पावलांनी मार्ग आक्रमिते नवजीवनाचा
  -------- च्या संसारात आशा करते आनंदाच्या.
- वृक्षवेलींच्या सान्निध्यात देहभान हरपते,
  ------- चे नाव घेऊन आशीर्वाद मागते.
- मंगलदिनी दिला सर्वांनी प्रेमाचा आहेर,
  ------- च्या करिता सोडते आज माहेर.
- संसाराच्या वेलीवर येतो मोहोर प्रीतीचा
  ------- चे नाव घेऊन निरोप घेते सर्वांचा.
- राधेच्या मनात कृष्णाचे चिंतन
  -------- चे नाव घेऊन सोडते मी कंकण.
- सत्यनारायणाची केली पूजा घेतला भक्तीने प्रसाद
  -------- च्या साठी मागितला आशीर्वाद.
- संध्याराणीने रेखिली चंद्राची कोर



  ------- च्या साठी मी पूजिली मंगळागौर.
- अश्विनीच्या तेजाने फुलली वसुंधरा
  ------ चे नाव घेते आज आहे दसरा.
- विजयाचे तोरण उभारले चैत्रप्रतिपदेच्या दिनी
  ------- नी घातले मंगळसूत्र अन् झाले मी सुवासिनी.
- चांदण्याच्या फुलांनी सजले आकाशाचे ताट
  ------- चे नाव घेते सोडा माझी पाठ.
- मांगल्याच्या तेजाने अुजळतो देव्हारा देवाचा
  ------- च्या संसारात फुलो फुलोरा सौख्याचा.
- शब्द सुमने गुंफून तयार होते काव्यमाला
  ------ चे नाव घेते ------- ची बाला.
- प्रीतीवीणा छेडिता होतो अनुरागाचा झंकार
  ------- चा करिते सुखाने संसार.
- मेघाचा वाजे मृदुंग, विजेच्या चाले नाच
  ------- राव म्हणतात गुपचूप दासबोध वाच.
- वसंताच्या आगमनाला कोकीळेची साद
  ------- च्या संसारात यावा सौख्याचा नाद.
- वसुंधरा सजते येताच श्रावणाच्या सरी
  ------ चे नाव घेते ------- च्या घरी
- अुंबरठ्याचे माप ओलांडून
  ------- च्या घरची झाले सून
  ------- ची गृहलक्ष्मी झाले भाग्य कोणते याहून.
- सौख्य प्राप्तीसाठी धरावी उद्योगाची कांस साऱ्यांच्या आग्रहास्तव घालते
  ----- ना जिलबीचा घास.
- शांतता आणि समता हेच नेहरूंचे धोरण
  ----- चे नाव घेते हळदीकुंकू हेच कारण.

- १९४७ साली भारताचा झाला स्वातंत्र्यसोहळा,
  ------- रावांनी लावला मला सौभाग्य टिळा.
- अंदमान बेटात सावरकरांना झाली शिक्षा
  ------- नी घातली मला सौभाग्याची भिक्षा.
- परस्पर सौख्यासाठी असते पती-पत्नीचे सर्वस्व अर्पण, देव ब्राह्मणांच्या साक्षीने ----- ना केले मी जीवन अर्पण.
- कर्तव्याच्या तारका चमकतात आपत्तीच्या ढगात
  ------ ची गृहलक्ष्मी होऊन आले नव्या घरात.
- प्रीत देई पाणी जीवनाच्या वल्लरीला,
  ------ ची पत्नी झाले, भाग्य आले फळाला.
- सद्गुणाच्या कोंदणात सौंदर्याची शोभा
  ------- च्या जीवनावर पसरे चैतन्याची प्रभा.
- सुखसमृद्धी मंदिराला समाधानाचं सोपान
  ------- च्या दीर्घायुष्याचे मला मिळो वरदान.
- वस्त्र शृंगारी शरीर, आरोग्य शृंगारी अंतर
  ------- च्या चरणाची सेवा घडो निरंतर.
- पुष्प तेथे गंध, भाव तेथे कविता
  -------- च्या जीवनाशी एक झाली, जशी सागराची सरिता.
- भावनेत जन्मली कल्पना, फुले गुंफिली शब्दांत
  ------- च्या पत्नीला लाभो अखंड सौभाग्य जन्मजात.
- संसाराच्या नौकेवरती पती असावे पत्नीचे साथी
  ------ चे नाव घेता मी होई त्यांची जन्मोजन्मीची सोबती.
- वाणीत असावा खडीसाखरेचा गोडवा
  ------- चे नाव घेते आहे आज पाडवा.
- चैत्रगौरीला वंदन करून मागते सौभाग्यदान



  ------ चे नाव घेऊन राखते तुमचा मान.
- सती सावित्रीचे पूजन करून वडाची करते पूजा
  ------ च्या दीर्घायुष्याशिवाय आशीर्वाद नको दुजा.
- आनंदाच्या अुर्मी घेऊन दसऱ्याचा आला सण
  ------- च्या सौख्यासाठी अखंड तेजो जीवन.
- व्हाल निःशंक मन, पाहून कन्येचा थाट
  ------ ची भार्या सोडे, दादा वहिनी गाठ.
- हृदय मंदिरात दिवा तेवो प्रीतीचा
  ------- चा संसार होवो सुखाचा.
- माहेरचे संस्कार अन् सासरचे वातावरण
  ------ च्या संसाराचे करीन मी नंदनवन.
- संसारवृक्षाला येवो बहर प्रीतीचा
  ------ च्या मुळे ठेवा लाभला सौख्याचा.
- विवाह मांगल्यामुळे दोन जीवांचे घडते मीलन
  ----- चे नाव घेऊन सोडते मी कंकण.
- प्राजक्तांच्या कळ्यांना सुगंधी वास
  ------ ना घालते करंजीचा घास.
- नाशिकच्या गंगेचा चिरेबंदी घाट
  ------ चे नाव घेते, सोडा माझी गाठ.
- स्त्रियांच्या जातीने काम करावे शक्तीपेक्षा युक्तीने
  ------ चे नाव घेते प्रेमभावे भक्तीने.
- स्वच्छता नी टापटीप आरोग्याचे मूळ
  ------ च्या जीवनासाठी सोडले ------ चे कूळ.
- देवाची मूर्ती घडविताना आनंदीत होतो शिल्पकार
  ------ ची सेवा हाच माझा अलंकार.
- सुशील सद्गुणी घरात लक्ष्मी करते वास,

------ ना घालते फेणीचा घास.

❒ औरंगाबादला प्रसिद्ध आहे वेरूळ अजिंठा लेणी,
------ ना घालते घास दूधफेणी.

❒ कवीच्या परिचयात भावनांची उपरती
------ चे प्रेम हीच माझी संपत्ती.

❒ जमीन दुभंगून सीता झाली गुप्त
------- ना वरून आईवडिलांना केले मुक्त.

❒ चतुर्थीच्या दिवशी निवडते दुर्वा
------ चे नाव घेते आशीर्वाद द्यावा.

❒ पौर्णिमेच्या दिवशी चंद्र असतो आकाशात
------ ची कीर्ती पसरो जगात.

❒ निसर्गाच्या अंतरंगात पावित्र्याचा सुवास
------ च्या जोडीने करिते आयुष्यभराचा प्रवास.

❒ हिंदमातेच्या हातात रत्न जडावाचे तोडे
------ चे नाव घेते वडील माणसांपुढे.

❒ माहेरच्या परिसरात वेचले मी ज्ञानकण,
------ चे नाव घेते लक्षात असू द्या सर्वजण.

❒ दिल्लीचे सिंहासन, पेशव्यांनी फोडले
------ च्या जीवासाठी माहेर मी सोडले.

❒ नंदनवनात करिते कोकीळा कूजन
------ चे नाव घेते झाले लक्ष्मीपूजन.

❒ द्वारकेचा राजा पाठीराखा द्रौपदीचा
------- ना घास घालते साखर-भाताचा.

❒ ताजमहाल बांधण्यासाठी कारागीर होते कुशल
------ चे नाव घेते तुमच्यासाठी स्पेशल.

❒ वसंतऋतुमध्ये जशी येते कोकीळेची चाहूल, तसेच मी टाकते



----- च्या घरांत पाऊल.

❒ लक्ष्मी शोभते दानाने, विद्या शोभते विनयाने
----- च्या संसारात मी राहते मानाने.

❒ हिमालय पर्वतावर बर्फाचे खडे
------ चे नाव घेते सर्वांच्या पुढे.

❒ फुलांची वेणी गुंफितो माळी
------ चे नाव घेते संध्याकाळच्या वेळी.

❒ रातराणीच्या सुगंधाने निशिगंध झाला मोहित
------- ना आयुष्य मागते प्रेमासहित.

❒ कन्या होते माहेरी, सून म्हणून आले सासरी
------ पती मिळाले भाग्यवान ठरले मी खरी.

❒ मानपानासाठी खोटेपणा नसावा
------ च्या पत्नीने हाच नियम पाळावा.

❒ रामचंद्रागत पुत्र जन्मला कौसल्येच्या कुशी
----- चे नाव घेते आनंदाच्या दिवशी.

❒ पहिल्याच दृष्टिभेटीत पटली जन्मोजन्मीची खूण
------- चे नाव घेते सर्वांचा मान राखून.

❒ प्रेमळ माहेर सोडताना पाऊल झाले कष्टी
------ च्या जीवनात होवो सुखाची वृष्टी.

❒ निर्मळ प्रेमाखेरीज नाही कशाची हाव आजच्या शुभदिनी
------ चे घेते नाव.

❒ जिलेबीचा गोड घास सर्वांच्या मुखी
------ च्या शीतल छायेत मी आहे सुखी.

❒ शुक्राची चांदणी गुप्त झाली ढगात
------ चे नाव घेऊन सांगते मी आहे सुखात.

❒ शेषाच्या फणीवर श्रीविष्णू झोपले सुखात

------- च्या जीवनात प्रीतीची ज्योत प्रशांत.

❒ वामन पंडितांची कविता, मोरोपंतांची आर्या
------ ची आज मी झाले भार्या.

❒ प्रेममय सहजीवनात मृदु भावनेचा बंध
------ च्या मुळे संसाराला बकुल फुलांचा सुगंध.

❒ अखंड नंदादीप देवापुढे तेवतो,
----- चे नाव घेणे सुखाचा क्षण वाटतो.

❒ चंदनाच्या झाडावर लक्ष्मी घेते विसावा
------ चे नाव घेते थोरांचा आशीर्वाद असावा.

❒ घरात असावे अंगण, त्यात असावी तुळस
------ च्या जीवनावर चढवीन आनंदाचा कळस.

❒ संसाररूपी सागराला सुखदुःखाची सावली
----- ना जन्म देणारी धन्य ती माऊली.

❒ पुण्याच्या गणपतीपुढे पसरले केवड्याचे पान
------ चे नाव घेऊन राखते तुमचा मान.

❒ सहस्त्रदल कमळात लक्ष्मीचा वास
------ चा लाभो प्रेमळ सहवास.

❒ नेत्रांच्या निरंजनात प्रीतीची लावते वात,
------ च्या बरोबर संसाराला करते सुरूवात.

❒ जाईजुईचा वेल मांडवावर चढे
------ चे नाव घेते लक्ष द्या इकडे.

❒ संसाररूपी दिव्याची प्रीती हीच वात
------ ची आहे मला जन्मोजन्मी साथ.

❒ जिजामातेच्या पोटी शिवाजीसारखा पुत्र
------ च्या करिता घालते मंगळसूत्र.

❒ दीनदुबळ्यांची करावी सेवा आंधळ्यांना वाढावी भाकरी



----- च्या चरणाची करिते मी चाकरी.

❒ जीवनाच्या फुलबागेत प्रीतीचे असावे सरोवर देवब्राह्मणाच्या साक्षीने संसार
फुलवेन ------ च्या बरोबर.

❒ अुंबरठ्याचे माप ओलांडून झाले या घरची सून
------ ची गृहलक्ष्मी झाले भाग्य कोणते याहून.

❒ गोडी घ्यावी गुळापासून, स्निग्धता घ्यावी तिळापासून
----- ची पत्नी नमस्कार करते आशीर्वाद द्या मनापासून.

❒ सासरच्या घरी वाहते सद्गुणांची सरिता
------ चे नाव घेते ---- ची दुहिता.

❒ लग्न करून जीवन झाले माझे सफल
------- चे नाव घेते तुमच्याकरिता स्पेशल.

❒ संसाराचे वस्त्र विणले सुखदुःखाच्या धाग्याने,
------ चा संसार करीन सुखाने.

❒ सौभाग्याची शोभा मंगळसूत्राचा साज,
------ च्या मुळे सौभाग्यवती झाले मी आज.

❒ सूर्यप्रकाशाने उजळल्या दाही दिशा
------ चा होवो उत्कर्ष हीच माझी मनीषा.

❒ श्यामल श्यामल ढगात विद्युल्लता पाजळते
------ च्या जीवनात प्रकाशज्योती उजळते.

❒ माहेरच्या प्रांगणात बहरला पारिजात
----- चे नाव घेते आनंदात.

❒ वेड मला सुरांचे, गानलुब्ध मी कोकीळा,
----- च्यासह फुलवीन मी सौख्याचा मळा.

❒ संगीताच्या स्वरलहरींनी आसमंत बहरते
------ च्या सहवासात मन माझे मोहरते.

- आईच्या मायेला बकुळीचा वास
  ----- ना घालते लाडवाचा घास.
- चालता वाट माहेरची, उणे वाटे चांदणे,
  ------ च्या सहवासात नांदते मी सुखाने.
- किती पुसावी लोचने, आसू नयनी दाटतात,
  ----- ची ओढ जरी पाऊले अडखळतात.
- असेच लाभावे माहेर, जुळावे नाते याच सासरशी
  ------ पती जन्मोजन्मी लाभावे हीच आस मनाशी.
- स्वामींची प्रीती शांततेची गोड मूर्ती
  ------ ना मिळो यश आणि कीर्ती.
- भाऊबहिणींची माया, आईवडिलांची छाया,
  ------ च्या सहवासात सुखावते काया.
- धुमधडाक्यात झाले लग्न, जुळले नाते पवित्र
  ------ च्या नावाने मी घातले मंगळसूत्र.
- गुंजभर सत्ता, मणभर सोने,
  ------- च्यामुळे लाभले सौभाग्याचे लेणे.
- मराठवाड्याच्या परिसरात वसली आहे वेरूळची लेणी, संसाररूपी कोंदणात
  ------ आहे हिरकणी.
- आजपर्यंत मुग्ध प्रेमाचे आले प्रसंग अनेक
  ------- चे नाव घेते ----- ची लेक.
- बागेत फुलली फुलं, आला घराला आकार,
  ------ च्या मुळे स्वप्न झाले साकार.
- झाली जागी प्रीत आज या उरांत
  ------ च्याबरोबर माप अुलथून आले या घरात.
- गरीबीत माझा संसार सावरते
  ------ नी थट्टा करताच लागलीच मी बावरते.



- भाव वीणा छेडताच निघतो प्रेमाचा झंकार
  ------ च्या सान्निध्यात फुलला माझा संसार.
- संसाररूपी सागरात प्रेमरूपी नौका
  -------- चे नाव घ्या नाव घ्या म्हणून भंडावून सोडू नका.
- महादेवाच्या पिंडीवर वाहते मी रोज त्रिदल
  ------ च्या विरहाने भरले नेत्रकमळ.
- चंद्राची रोहिणी, दिवाकराची अुषा
  ------ चे नाव घेते ------ ची स्नुषा.
- सासुसासऱ्याच्या आशीर्वादाने भरली माझी संसारवेल
  ------ संसारात वाटचाल करताना झाली सुखाची रेलचेल.
- इंग्लिशमध्ये ताजमहालला म्हणतात ब्युटीफूल माझे पती
  ------- आहेत ड्युटीफूल.
- हरितालिकेची पूजा करून गिरिजेने घातले शंकराला कोडे
  ------- च्या प्रीतीने मला अक्षरशः केले वेडे.
- कृष्णाच्या मुरलीने राधा गेली बावरून
  ------- चे नाव घेऊन पूजेला बसते सावरून.
- मैफलीची सांगता होते भैरवीने
  ------ च्या कर्तृत्वाने सुखी व्हावे ------ ने (पत्नीचे नाव)
- शिक्षण व संस्कारांनी मात्यापित्यांनी जीवन केले धन्य
  ------ रावांच्या संसारात ओतीन तन-मन-धन.
- सुगम संगीताला साथ लागते तबला पेटीची
  ------- चे नाव घेऊन सुरूवात करते संसाराची.
- संस्कार केले आईने, शिक्षण दिले पित्याने

------ चे नाव घेते तुमच्या आशीर्वादाने.

- हिरव्या हरळीवर बागडते हरिणी
  ------ च्या जीवनाची आहे मी सहचारिणी.
- आई गेली वडील गेले, केले भावाने नाते सैल
  ------ नी धीर दिला म्हणून आली नाही पश्चातापाची वेळ.
- संगीतमय नाटक आहे सुभद्राहरण
  ------ चे नाव घ्या म्हणायचे आज आहे काय कारण.
- महादेवाच्या पिंडीवर द्राक्षाचा वेल
  ------ राव पूजा करतात, मी वाहते बेल.
- द्राक्षाच्या वेलीचे त्रिकोणी पान,
  ------ चे नाव घेऊन राखते तुमचा मान.
- महादेवाच्या पिंडीवर बेल वाहते ताजा संसारनौकेत मी राणी
  ------- राव आहेत राजा.
- महादेवाच्या पिंडीला नागाचा वेढा
  ------ रावांचा नी माझा जन्माचा जोडा.
- राधा कृष्णाचे नाव घेतात जोडीने
  ------ च्या प्रेमामुळे ------ राव परततात ओढीने.
- पुरातनकाळात बऱ्याच देवांनी केले प्रेमविवाह,
  ------ च्या प्रीतीने जीवन होईल सुसह्य.
- महादेवाच्या पिंडीवर बेल वाहते ताजा
  ----- चे नाव घेण्याचा पहिला मान माझा.
- राजराणी मीरेने प्रभू मानिले कृष्णाला
  ------ चे नाव घ्यायला आढेवेढे कशाला.
- पौर्णिमेची रात्र ल्याली चांदण्याचा साज
  ------ च्या समवेत गृहप्रवेश करते आज.



- जगताला प्रकाश देऊन कर्तव्य करतो दिनेश,
  ------ चे नाव घेऊन करते आज गृहप्रवेश.
- गृहप्रवेशाचे वेळी भावना अुसळत आहे,
  ------ च्या सहवासात गंध सुगंध अनुभवत आहे.
- गृहप्रवेशाच्या वेळी थरथरत्या मनात भावनांचा कल्लोळ,
  ------ च्या सहवासात संसाराच्या वाटचालीत लागणार नाही वेळ.
- अुगवत्या चंद्राची रजनीला लागली चाहुल,
  ------- चा हात धरून टाकते आज सासरी पहिले पाऊल.
- कळी अुमलते आहे, फुल बनू पाहत आहे,
  ------ च्या सहवासात गंध अनुभवते आहे.
- सुखदुःखाच्या सावलीत चढायला आहे संसाराचा घाट,
  ------ ची साथ असेल तर अवघड वाटणार नाही वाट.
- भगिनींनो आता मिळणार नाही हक्काची रजा
  ------ चे नाव घेऊन सांगते, वाजवू नका कुटुंबनियोजनाचा बेंडबाजा.
- झालं शुभमंगल करा संसार सुखाचा
  ------ चा अुपदेश ऐकून वाढवा पसारा बेताचा.
- शर्वरीच्या तनुलतिकेवर चांदण्याचा शेला
  ------- नी भाग्याचा कलश हाती दिला.
- चांदण्याच्या रसात पुलकीत होते अवनी
  ----- च्या सुखाचे वरदान मागते मनोमनी.
- दाटून येणाऱ्या स्मृतींची साक्ष दिसते नयनात
  ------ ची आणि ------ ची जोडी असो सदा सौख्यात.
- भारतमातेला करते अभिवादन नम्रपणे वाकून

------ चे नाव घेते तुमचा मान राखून.

❒ घुंगुरवाळे गेले, सरली बाल्याची स्मृती
------ च्या सहजीवनाची जडली नवी नाती.

❒ श्याम संध्येचा लाल केशरी साज
------ च्या हृदयाची स्वामिनी झाले मी आज.

❒ हिरव्या तृणपात्यांवर दवबिंदूचे मोती
------- च्या हृदयी उजळो माझी जीवनज्योती.

❒ यामिनीच्या अंगावर चांदण्याचा शेला
------ च्या मुळे सौभाग्याचा लाभला मान मला.

❒ चंदनगंधी गारवा फुलवी चांदणी रात, संसारात पदार्पण करते
------ धरून ------ रावांचा हात.

❒ कुलदेवतेला वंदन करून घेते वडिलांचे आशीर्वाद
------- चा संसार करताना सदैव अैकू यावी प्रीतीची साद.

❒ श्रीमंतीचा नसावा गर्व, नसावा विद्येचा अहंकार, संसाररूपी रथाचा
------ राव उचलतील अर्धा भार.

❒ मागे माहेरची माया, पुढे सासरची ओढ, संसारात मिळाली आहे
------ ची जोड.

❒ जीवनाची चालते वाट धरून
------- चा हात, आपल्या आशीर्वादाने होईल सुखाची बरसात.

❒ संसाराच्या सारीपाटावर सुखदुखाचे दान
------ च्या सहवासात सुखाची नाही वाण.

❒ हिमालयाच्या परिसरात आहे रम्य मानस सरोवर, या पुढील जीवनप्रवास
------ च्या बरोबर.



❒ चातक आहे आनंदित, लागली वर्षाऋतुची चाहुल,
----- च्या घरात टाकते आज पहिले पाऊल.

❒ भक्तीभावाने वंदन करते गौरीमाते तुला
----- चे सौभाग्य छत्र अखंड लाभो मला.

❒ सरितेला नेहमीच सागर मीलनाची आस
------ ह्या पुढे राहो ------ च्या हातात हात.

❒ मंगलवेळी मंगलकाळी वाजली टाळी
------ चे नाव घेण्याची आली माझ्यावर पाळी.

❒ माहेरचे दिवस पंखाप्रमाणे उडाले तेथील स्मृती घेऊन
------ च्या मुळे झाले ------- ची सून.

❒ टाळ वाजे, वीणा वाजे, वाजे मधुर बांसरी
------ च्या समवेत सुखी आहे संसारी.

❒ दोन शिंपले एक मोती, दोन वाती एक ज्योती,
-------- ची राहो अखंड प्रीती.

❒ माहेरच्या आठवणींनी झाला वर्तमानकाळ ओला चिंब,
------- चे पाहीन अखंड प्रतिबिंब.

❒ नदी वाहे वेगाने भीमा होई लुप्त,
------ च्या हाती हात देऊन वडील झाले मुक्त.

❒ कण्व ऋषींच्या आश्रमात शकुंतलेचे माहेर
------ नी केला मला सौभाग्याचा आहेर.

❒ अभिमान नसावा पैशाचा, गर्व नसावा रूपाचा,
------ ना घास घालते वरणभात तुपाचा.

❒ नाव घ्या, नाव घ्या म्हणून आग्रह झाला अुखाणा घेण्याचा,
------ चे नाव आहे ओठी पण प्रश्न पडला अुखाण्याचा.

❒ शंकर बसले तपश्चर्येला, पार्वतीने बदलला वेष
------ च्या सहवासात नाही दुःखाचा लवलेश.

- श्रीमंतांना लखलाभ श्रीमंती, गरीबांचा देव वाली,
  ------ च्या जीवावर आहे मी भाग्यशाली.
- संसाररूपी सागरात पती-पत्नी असावे हौशी,
  ------ चे नाव घेते मंगळागौरीचे दिवशी.
- आईवडिलांचे कर्तव्य संपले झाली माझ्या कर्तव्याची सुरवात.
  ------- चे नाव घेऊन प्रवेशते गृहात.
- रुसलेल्या राधेला कृष्ण म्हणतो हास
  ------ ना घालते जिलबीचा घास.
- जन्म दिला मातेने, पालन केले पित्याने
  ------ चे नाव घेते पत्नी या नात्याने.
- आई वडिलांच्या सावलीत वाढले, बहिण भावंडात रमले,
  ------ च्या मुळे ------ ची सून मी झाले.
- शांत शांत उत्तररात्री मंद मंद वारा
  ------- च्या सहवासात शीण विसरते सारा.
- मंगळसूत्रातील दोन वाट्या असते सासर माहेरची खूण
  ------- चे नाव घेते ---- ची सून.
- सागराला आली भरती नदीला आला पूर
  ------- च्या साठी आई बाप केले दूर.
- माहेर पणती, सासरची वात
  ------ च्या समवेत पाऊले टाकलीत सात.
- भरल्या पंक्तीत उदबत्तीचा वास
  ------ ना देते जिलेबीचा घास.
- हंसाला लागतो चारा मोत्यांचा
  ----- ना घास घालते लाडूचा.
- आशीर्वादाची फुले झेलते वाकून
  ----- चे नाव घेते तुमचा मान राखून.



- पंक्तीत असते रांगोळी चित्रांची
  ------- रावांसोबत पंगत बसली मित्रांची.
- वसंतऋतुची कोकीळेला लागते चाहूल,
  ------ च्या समवेत ----- च्या घरात टाकते पहिले पाऊल.
- सोन्याच्या मंगळसूत्राचे रवे रवे जोडले,
  ------- रावांसाठी मी आई बाप सोडले.
- घट्ट दही श्रीखंड मेवा,
  ------- रावांचे नाव घेते लक्षात ठेवा.
- वर्षा ऋतुत आकाशात लखलखतात विजा
  ------ च्या सह करते सत्यनारायणाची पूजा.
- माहूरची रेणुका होते तांबुलाने खुश
  ------- रावांमुळे उजवली कूस.
- चंदनाच्या झाडाला नागाचा वेढा
  ------- चे नाव घेते वन्स गाठ सोडा.
- वर्षा ऋतुत पर्जन्याने केली त्रेधा
  ------ च्या सहवासात झाली प्रीतीची बाधा.
- अुगवता बाल रवी आहे चंद्राचा मित्र
  ------- च्या नावाने बांधले मंगळसूत्र.
- अंगणातील तुळशीला पावित्र्याचे स्थान
  ------- चे नाव घेऊन राखते तुमचा मान.
- मनाला आल्हाददायक तुळशीपुढील वात
  ------- चे नाव घेऊन चालते संसारवाट.
- झालीच्या परातीत लावतात सतरा वाती
  -------- रावांबरोबर सप्तपदी चालून केली सैल माहेरची नाती.

- सुखाचे व्रत अन् प्रीतीचा आनंद
  -------- नी भरला जीवन नौकेत आनंद.
- प्रीतीने नहाते अन् रोज अैश्वर्याचे लेते लेणे,
  -------- रावांच्या घरात मला काही नसे अुणे.
- शारदेने छेडली वीणा, उठले मधुर झंकार
  -------- च्या मदतीने करीन सुखाचा संसार.
- मांगल्याच्या तेजाने उजळतो देवाचा गाभारा
  -------- च्या संसारात फुलो सौख्याचा फुलोरा.
- वसुंधरा सजते येता श्रावणसरी
  -------- चे नाव घेते ------- च्या घरी.
- सप्तपदींची सात पाऊले सात जन्माची ठरावी
  -------- च्या जीवनात मी जन्मोजन्मी असावी.
- वडिलांच्या मायेमुळे काही पडत नाही अुणे
  ------- चे नाव घेऊन मागते आशीर्वादाचे लेणे.
- ज्यांचे विचार आहेत उच्च आणि राहणी आहे साधी,
  -------- च्याबरोबर चालते, मी सप्तपदी.
- विवाह बंधनात बांधल्या जातात मंगल गाठी
  ------- चे नाव घेते तुमच्या आग्रहासाठी.
- सौभाग्याची शोभा, मंगळसूत्राचा साज
  ------ च्या मुळे भाग्यवती झाले मी आज.
- यमुनेच्या जलात दिसते प्रतिबिंब ताजमहालचे
  ------ रावांच्या हृदयात सिंहासन प्रीतीचे.
- १९४७ साली भारत स्वतंत्र झाला
  ------- च्या नावाला आज आरंभ झाला.
- सूर्यनारायण आहेत निसर्गाचे माळी
  ------- चे नाव घेते मंगळागौरीचे वेळी.



- चंदनाची चोळी अंग अंग जाळी
  ------ चे नाव घेते ----- चे वेळी.
- पौर्णिमेच्या रात्रीची रोहिणी पाहते वाट
  ------ च्या नावावर मिरविते संसाराचा थाट.
- श्रीकृष्णाच्या प्रीतीचा रुक्मिणीने घेतला ध्यास
  ------ च्या सहवासात फुलते आनंदाची रास.
- बिबीचा मकबरा बांधणारे कारागीर होते कुशल,
  ------ चे नाव घेते तुमच्याकरिता स्पेशल.
- स्वतंत्र भारतात स्त्रीला लाभलेत अनेक हक्क
  ------ चे नाव अैकून तुम्ही व्हाल थक्क.
- सुशिक्षित महिलांनी संसार करावा नेटका
  ------- चे नाव लक्षात ठेवून न बसावा फटका.
- मुकुंदाची प्रीत मुरली गाते सुरात
  ------ ना वरून आले ----- च्या घरात.
- संसाररूपी कादंबरी स्त्रियांनी वाचावी
  ------- च्या संसारात अुणीव कशाची नसावी.
- सावित्रीचा संदेश 'पती तेथे सती'
  ------ चे नाव घेते पण आग्रह नको अती.
- प्रेमरूपी नावेत मनरूपी नावाडी
  ------ चे नाव घेते तुम्ही म्हणता म्हणून बापडी.
- मुके झाले शब्द ओठी लज्जेचे बंधन
  ------ च्या नावाभोवती कशी करू अुखाण्याची गुंफण.
- चांदीच्या करंड्याला मोत्याचा कळस
  ------ चे नाव घेते संध्यासमयास.
- महादेवाच्या पिंडीला चौकोनी चार चिरे
  ------ चे नाव घेऊन वाहते मी हिरे.

- तिरंगी झेंड्याला चक्राची खूण
  ------ चे नाव घेते ------- ची सून.
- चांदीच्या वाटीत केशरी पेढा,
  ------- चे नाव घेते वन्स गाठ सोडा.
- चांदीच्या पेल्यात होते सरबत
  ------- चे नाव घेऊन सांगते, मला नाही करमत.
- चांदीच्या वाटीत डाळिंबाच्या फोडी
  -------- रावांच्या अंगठीत राधाकृष्णाची जोडी.
- श्रीरामचंद्र झाले वचनबद्ध सीतेला घडला वनवास,
  ------ चा माझ्या जीवनी नित्य लाभो सहवास.
- सौजन्य आणि शीलता ह्यातच आहे स्त्रीचे स्त्रीपण,
  ------ चे नाव घेते विसरून माझे मी पण.
- अखंड सौभाग्यासाठी देवीला करते नमस्कार,
  -------- रावांचे सतत- मुखी नाव हेच माझे अलंकार.
- चकोराची साद, वर्षा ऋतुची हाक उभ्या संसारात,
  ------ रावांशी न होवो उभ्या संसारात वाद.
- दया, क्षमा, शांती साधुसंतांचे लेणे,
  ------ च्या संसारात काही न पडो उणे.
- हिमालय पर्वतावर बर्फाच्या राशी
  ------- चे नाव घेते ------- च्या दिवशी.
- नेत्राच्या निरांजनात प्रीतीची वात,
  ------- च्या नावाने केली संसाराला सुरुवात.
- हृदयाच्या कोंदणात प्रीतीची खाण
  ------ च्या सहवासात सुखाला नाही वाण.
- जीवन कलहात आहे सुखदुःखाचा वारा
  ------ च्या सहवासात दुःखाला नाही थारा.



- देहाच्या दीपात लावीन जीवनाच्या वाती
  ------ च्या सुखदुःखात कधीही होणार नाही रिती.
- संसार करून परमार्थ साधावा हीच संतांची शिकवण
  ------ च्या जीवनात फुलवीन मी नंदनवन.
- काश्मीरच्या नंदनवनात होतो नवदांपत्याला स्वर्गाचा भास,
  ------ ना देते ------ चा घास.
- पौर्णिमेच्या दिवशी यामिनीला लागतो चंद्राचा ध्यास,
  ------- ना देते जिलबीचा घास.
- दोन मनांचे व्हावे मीलन व्हावी मैत्री दाट,
  ------- चे नाव घेऊन आक्रमते पुढील वाट.
- प्रीतीच्या संदेशातून जन्मले मेघदूत काव्य
  ------ च्या प्रीतीने भारावून जाऊन केले मी हे दिव्य.
- शीळ घाली वारा वेळूच्या वनात
  -------- ची मूर्ती -------- च्या मनात.
- दाटून येणाऱ्या स्मृतींनी अश्रुंची होते बरसात
  ------- च्या जीवनात होवो सुखाची खैरात.
- काव्यामध्ये श्रेष्ठ आहे अलंकार अुपमा अुत्प्रेक्षा
  ------- सुखी असावेत हीच माझी अपेक्षा.
- स्वातंत्र्याच्या होमकुंडात टाकली वीरांनी उडी
  ------ च्या नावाने आज घातली मंगळसूत्र जोडी.
- सुशील सासू-सासरे, सद्गुणी मातापिता
  ------- चे नाव घेते सर्वांकरिता.
- नमस्कार वडिलांना, आशीर्वाद लाखाचा
  ------- च्या बरोबर संसार करीन सुखाचा.
- चंद्र प्रकाशतो आकाशात, प्रतिबिंब पडते तळ्यात
  ------- चे नाव घेते मैत्रिणीच्या मेळाव्यात.

- शुभमंगलप्रसंगी येतो सर्वांना आहेर
  ------- च्या करिता सोडले आज मी माहेर.
- चंद्राला आले हसू, रजनीला लागली चाहूल
  ------- च्या जीवनात टाकले आज पहिले पाऊल.
- सुदाम्याचे पोहे भगवान कृष्ण भक्षी
  -------- ला वरताना आहे परमेश्वर साक्षी.
- हृदयाच्या कपाटात प्रीतीचे धन
  ------ च्या सहवासात विकसले जीवन.
- रजनीच्या कंठी असते तारकांची माला
  ------ चे नाव घेते ----- ची बाला.
- चंद्रावाचून नभ, सुगंधावाचून सुमन
  ------ रावांवाचून निष्फळ ------ चे जीवन.
- झाली प्रभात विहंग उडाले आकाशात
  ------ च्या हाती दिला जन्मभर हात.
- शेषशायी भगवान निद्रिस्त झाले शांत
  ------ च्या संसारात तेवो प्रीतीची ज्योत प्रशांत.
- प्रेममय जीवनात मृदू भावनांचे बंध
  ------- च्या संसारात बकुल फुलांचा सुगंध.
- घरातील अंगणात सदैव डोलावी तुळस
  ------- च्या जीवनावर चढवीन आनंदाचा कळस.
- माहेरची लाडकी कन्या, सासरची प्रेमळ सून
  ----- ची अर्धांगी झाले भाग्य यापरते कुणाहून.
- मुके झाले शब्द ओठी लज्जेचे बंधन
  ------- च्या नावाभोवती कशी करू अुखाण्याची गुंफण.
- नव्या नव्या आशा घेऊन अुगवतो सूर्यनारायण,
  ------ चे नाव घेते कारण आज आहे सत्यनारायण.



- हृदय तारेच्या वीणेवर झाला प्रेमाचा झंकार
  -------च्या बरोबर देवाब्राह्मणाच्या साक्षीने दिला होकार.
- आकाशाच्या मांडवाला इंद्रधनुचे तोरण
  ------ चे नाव घ्यायला मंगळागौर हे कारण.
- श्रावणात फळाफुलांनी बहरते सृष्टी
  ------- च्या संसारात होवो सुखाची वृष्टी.
- संसार वृक्षावर फुले मोहर प्रीतीचा
  ----- चे नाव घेऊन निरोप घेते सर्वांचा.
- श्री चे नाव घेऊन करतात सुरुवात कार्याची, संसाराच्या वाटचालीत
  ----- ना राहो आठवण भार्येची.
- संसाराच्या वाटेवर दोघे सहप्रवासी नवे
  ------- चे नाव घेताना तुमचे आशीर्वाद हवे.
- गोपगोपींच्या रासक्रीडांनी पावन झाला यमुना घाट
  ----- चे नाव घेऊन सोडते शेल्याची गाठ.
- संसाराच्या अुनपावसात थोराचे असावे छत्र
  ------ च्या नावाने घातले गळ्यात मंगळसूत्र.
- कमल पुष्पाभोवती भ्रमर घालतो रुंजी
  ------- रावांना घास देते ओल्या नारळाची करंजी.
- चंद्रबिंबामुळे वसुंधरेवर बरसतात चंद्रकिरणधारा,
  ------ च्यासह गृहलक्ष्मीबरोबर भाग्य येवो घरा.
- वातावरणातील सनईचे सूर भावसुमने उधळतात
  ----- चे नाव घेताना शब्द ओठी अडकतात.
- हातात असावे कर्तृत्व, मनात असावा स्वाभिमान
  ------ च्या सारखा लाभला पती यात सर्व सुख समाधान.
- एका वाफ्यांतील तुळस, दुसऱ्या वाफ्यांत रुजविली,
  ------ ची लेक मी आपलीच मानली.

- छोट्याशा माझ्या घरकुलात दारे खिडक्या मात्र रुंद,
  ------ रावांच्या संसारात मात्र प्रवेश नाही कुणाला बंद.
- श्रीरामाच्या पदस्पर्शाने अहिल्या झाली पावन,
  ------ च्या सहवासात माझं होईल सोनं.
- शांततेची फुलली बाग, मानवतेचे तेथे सरोवर
  ------ च्या बरोबर करते जीवनप्रवास करून नमस्कार.
- राहणी असावी साधी, कृती असावी भव्य
  ------ च्या बरोबर अनुभवते मधुर काव्य.
- धरणी मातेला आकाशाची सावली
  ------- ना जन्म देऊन धन्य झाली ती माऊली.
- देवीच्या देवळात भक्त गातो भैरव
  ------ च्या मुळे माझा झाला गौरव.
- संक्रांतीच्या सणात सौभाग्याची पेरू, बोरे, औदार्याचा ऊस,
  ------- च्यामुळे उजळली माझी कूस.
- रांधा वाढा उष्टी काढा कंटाळा आला मला म्हणून मी म्हणते
  ------- राव काश्मीरला चला.
- महाभारत हा ग्रंथ सत्यवतीने घडविला
  -------- नावासाठी मामीने अडविले.
- भारताच्या फाळणीने राष्ट्रीयत्वाला पडली भेग
  ------ रावांच्या जीवनाला माझ्यामुळे वेग.
- पांडुरंगाची रुक्मिणी बसली दिंडीखनांत रुसून
  ------ रावाच्या जीवावर मी राहते हसून.
- हिमालयावर बर्फाच्या राशी
  ------ नाव घेते अमक्या दिवशी.
- गोठ नको पाटल्या नको नको मला सरी
  ----- रावांच्या जीवावर काळीपोत बरी.



- कुणाची करू नये निंदा कुणाचे काढू नये वर्म
  ------- नाव घेते माझा पतीव्रता हा धर्म.
- साखर झाली महाग, पदार्थांत घालतात थोडी
  ------ नाव घेण्याची अपूर्व गोडी.
- तेल गेलं तूप गेलं आलं धुपाटणे हाती
  ----- संसाराला मदत म्हणून मी करते फुलवाती.
- जीवनरूपी बागेत, स्नेहरूपी सरोवर
  ------- संसाराचा प्रवास -----च्या बरोबर.
- वसंतात फुलली कळी, झाली लाजरी फुलवेणी
  ----- च्या संगतीत गाईन - प्रेमरूपी गाणी.
- ठरविलेले, योजिलेले मनांत मिळत नाही सारखे
  ----- विवाहानंतर कन्या होती आईबापाच्या मायेला पारखे.
- सृष्टीला म्हणतात, बहुरत्ना वसुंधरा
  ----- विवाहानंतर वधुच्या डोळ्यांना लागतात धारा.
- इंग्रजीत चूक झाली की म्हणतात सॉरी
  ----- रावांच्या आईला हवी होती सून गोरी.
- सासरी सत्यनारायणाच्या पूजेला वधु बसते अंग चोरून
  ------ पण त्यांचे सारे लक्ष असते माहेरी वेधून.
- उजळ माथ्याने करावा संसार, प्रेमाचे नको खोटे नाटक
  ----- बिघडवायला टपले असतात समाज कंटक.
- झांशीची राणी होती मोठी जहांबाज
  ------ चे नाव घ्यायची काय मोठी बात.
- अहिल्या देवी होळकरने भारतात केल्या जनांकरिता सुखसोई
  ------ नाव घ्यायची मला नाही अपूर्वाई.

- सासरी निघतांना मन येत भरून । पावले होतात जड
  ------ च्या सोबतीने चढून जाईन गड सिंहगड.
- माहेरची भाजी भाकरी । सासरची पुरणपोळी
  ----- हातात हात दिला की, गिळावी लागते कडू गोळी (निंदेची).
- विवाह बंधनांत अडकले की, गमावले जाते स्वातंत्र्य
  ----- नाव घेताच मुलगी होते जन्मभर परतंत्र.
- दिली कन्या केले कन्यादान
  ----- च्या संगतीत नाही कशाची वाण.
- झालीच्या परातीत दिवे लावतात सात । दसऱ्याच्या दिवशी हातात दिला हात । दिवस जायला वेळ नाही. काळ जातो बदलत
  ------ स्वभावाचा लागला नाही अंत.
- संसार संपतो मुलं मोठी झालीत
  ----- घरांतील माझी चूल नाही सुटली.
- सध्या प्रकाशात दिव्याचा हवासा वाटतो प्रकाश
  ----- प्रपंचात कळले नाही मला वेळ गेला सावकाश.
- इंग्लंड-अमेरिका-आफ्रिका तिसरी
  ------ मरण ---- ओसरी.
- गांधी तत्वज्ञानाचा आहे अहिंसा सत्य निष्ठेवर भार
  ------ च्या संसाराला मी दिला आधार.
- चारही धामाचा होता आनंद
  ------ वैद्य वहिनींनी चारही धाम केला त्याचा मला आनंद.
- अलका कुबल नेहमीच करते भूमिका त्यागी
  ------ नाव घेते आज आहे भोगी.



- शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा केला खून
  ------ चे नाव घेते अमक्याची सून.
- इंग्रजीत चंदा म्हणतात मून
  ------- नाव घेते ----- सून.

◆◆◆